**वाचले :-**

१. आदेश क्र. प्रशा/२/कावि/६५०/२०२२ दिनांक ०४/०८/२०२२
२. आदेश क्र.साप्रवि/३अ/कावि/१८६/२०२४ दिनांक १७/१२/२०२४
३. शहर अभियंता, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांचेकडील पत्र क्र.मातवि/१२/कावि/६५/२०२५ दिनांक ०३/२/२०२५
४. आदेश क्र. साप्रवि/१/कावि/८०/२०२५ दिनांक ०६/०३/२०२५

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८,सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/१/कावि/६६/२०२५
दिनांक ०६/०३/२०२५

**विषय** - लेखाधिकारी पदाचे कामकाजाबाबत...

**आदेश,**

श्री.गायकवाड आनंद जगन्नाथ यांचेकडे उपरोक्त वाचले क्र. १ चे आदेशान्वये मनपाचे व स्मार्ट सिटी कार्यक्षेत्रांतर्गत सी.सी.टी.व्ही सर्व्हेलन्स प्रकल्पाचे कामकाज सोपविण्यात आले होते. उपरोक्त वाचले क्र. २ चे आदेशान्वये श्री.गायकवाड आनंद जगन्नाथ, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतून दिनांक ३१/०१/२०२५ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेले आहेत. उपरोक्त वाचले क्र. ३ चे पत्रान्वये श्री.गायकवाड आनंद यांच्या सेवानिवृत्तीनंतर वरीलप्रमाणे कामकाज अन्य अधिकारी यांचेकडे सोपविणेकामी विभागप्रमुखांनी कळविलेले आहे.

सबब मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने मनपाचे व स्मार्ट सिटी कार्यक्षेत्रांतर्गत सी.सी.टी.व्ही सर्व्हेलन्स प्रकल्पाचे लेखाधिकारी पदाचे अतिरिक्त कामकाज **श्री. कोरके सुनिल लक्ष्मण, लेखापाल** यांचेकडे सोपविण्यास प्रस्तुत आदेशान्वये मान्यता देत आहे.

श्री. कोरके सुनिल लक्ष्मण, लेखापाल यांनी स्वत:चे मुळ आस्थापना असलेले विभागाचे कामकाज, तसेच यापूर्वी सोपविण्यात आलेल्या विभागाचे अतिरिक्त पदभाराचे कामकाज करावयाचे आहे. सदर अतिरिक्त पदभाराचे अनुषंगाने त्या पदास प्रदान केलेले अधिकार वापरण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून करण्यात यावी.

सही/-
(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

प्रति,
संबंधित अधिकारी
प्रत- १) लेखा  २) लेखापरीक्षण विभाग  ३) संबंधित विभाग

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८